माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सहायक संचालक (माहिती) गट-ब या संवर्गातील पदावर देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती रद्द करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्र.मावज-२०१४/७६०/प्र.क्र. २१९/का-३४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १ फेब्रुवारी, २०१६

संदर्भ: १) शासन आदेश समक्रमांक दि. १२/८/२०१५
२) श्रीमती मीरा ढास-काळकुटे यांचा दि.१९/८/२०१५ चा अर्ज.

शासन आदेश:-

उपरोक्त संदर्भाधीन आदेशातील अ.क्र. १ नुसार उपसंपादक, गट-क मधील श्रीमती मीरा ढास-काळकुटे यांना सहायक संचालक (माहिती) या संवर्गातील रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन- ४४०० या वेतनश्रेणीतील माहिती अधिकारी, भंडारा या रिक्त पदावर तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली होती.

२. तथापि, श्रीमती मीरा ढास-काळकुटे यांनी संदर्भाधीन क्र.२ मध्ये नमूद विनंती अर्जान्वये तदर्थ पदोन्नती नाकारत असल्याचे कळविले असल्यामुळे श्रीमती ढास यांची संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये दिलेली तदर्थ पदोन्नती रद्द करण्यात येत आहे. सदर तदर्थ पदोन्नती रद्द केल्याच्या परिणामी श्रीमती मीरा ढास-काळकुटे ह्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुख्यालय, मुंबई येथे उपसंपादक या पदावर पूर्ववत कार्यरत राहतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०११७२३१७८००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MUSALE RAMKISAN NARAYANRAO

Digitally signed by MUSALE RAMKISAN NARAYANRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GOVT. OF MAHARASHTRA,CID - 916891, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=eb28cc64e4adc3dd948671d0896f641e3e54c25e6deb33a784d0a3d037ae7ff8, cn=MUSALE RAMKISAN NARAYANRAO
Date: 2016.02.01 17:23:46 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मंबई/नागपूर,
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व परीक्षा), मंबई/नागपूर,
४) संचालक(माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
५) संचालक(माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

६) संचालक(माहिती) नागपूर-अमरावती विभाग, नागपूर/मराठवाडा विभाग, औरंगाबाद,
७) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
८) निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
९) उपसंचालक(लेखा) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१०) संबंधित अधिकारी (मावज मार्फत),
११) निवड नस्ती.